# राज्यशास्त्र विभाग

शैक्षणिक सत्र २०१९–२०२० मध्ये राज्यशास्त्र विभागाचे वतिने विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक, सामाजिक व राजकीय विकासासाठी पुरक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

याचाच भाग म्हणुन दि. २६ नोव्हेंबर २०१९ रोजी 'संविधान दिन' आयोजित करण्यात आला. कनिष्ठ महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागातील प्रा. डी. आर. उन्हाळे यांचे नेतुत्वात आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी संविधानाच्या महत्वाविषयी आपले मनोगत व्यक्त केले. त्याचप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षीका मा. प्रा. योगीनी सुरडकर, प्रा. अनिल कदम, प्रा. सावळे, प्रा. सोमवंशी, प्रा. पडघान, प्रा. रिंढे यांच्यासह इतर प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दि. १० डिसेंबर रोजी 'जागतिक मानवी हक्क दिन' आयोजित करण्यात आला. तसेच 'राष्ट्रीय सेवा योजना' वार्षिक शिबीर, सातगांव भुसारी येथे ३० डिसेंबर रोजी याविषयावर राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. जे. जे. जाधव यांनी विद्यार्थी व गावकऱ्यांना मार्गदर्शन करून मानवी हक्कांचा अर्थ व महत्व समजावून सांगितले.

दि. २५ जानेवारी २०२० रोजी वार्षिक स्नेहसंमेलना निमीत्त आयोजित ''सांस्कृतीक कार्यक्रमाच्या'' आगोदर ''भारतीय मतदार दिनाचे'' आयोजन करण्यात आले. या प्रसंगी प्रा. डॉ. जे. जे. जाधव, प्राचार्य डॉ. निलेशराव गावंडे, प्राचार्य डॉ. ए. एम. गारोडे, मा. सुधीर चेके पाटील प्रा. डॉ. पडवाल यांनी मोठया संख्येने उपस्थित विद्यार्थ्यांना मतदारांची नांव नोंदणी व मतदान करणे लोकशाहीच्या सशक्तीकरणासाठी कसे महत्वाचे आहे? या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे मोठया संख्येत उपस्थित विद्यार्थी कर्मचारी यांनी ''मतदानाची सामुहिक शपथ'' घेतली.

याशिवाय एस. पी. एम. महाविद्यालय चिखली व बुरूंगले विज्ञान व कला महाविद्यालय शेगांव यांनी आयोजित केलेल्या दि. २१/०१/२०२० रोजी राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक श्रमदान शिबीरा मध्ये ''राष्ट्रीय नागरीकत्व सुधारणा विधेयक फेब्रुवारी २०२०'' संबंधाने CAA, NRC, व NPR या विषयाच्या अनुषंगाने सविस्तर मार्गदर्शन केले. त्यासाठी ''नागरीकत्व दुरूस्ती कायदा–वास्तव व भ्रम'' असा विषय निश्चीत करण्यात आला होता. यावेळी मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. गणेश मालटे हे सुध्दा सहमार्गर्शक म्हणुन उपस्थित होते.

सामाजिक शास्त्र विभागाच्या (Humanities) वतीने ''गांधी रिसर्च फाऊंडशन'' जळगाव येथे दि. ३१ जानेवारी २०२० रोजी शैक्षणीक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा गांधी एक राजकीय विचारवंत म्हणून त्यांचे जिवन व कार्य याची माहिती व ज्ञान राज्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांना प्राप्त व्हावे हा सहलीच्या आयोजना मागचा हेतू होता. गांधीजींचे सत्य, अहिंसा, सहिष्णुता, राष्ट्रिय ऐक्य, शांतता व सामाजिक सद्भाव या मानवी मुल्यांचे आकलन विद्यार्थ्यांना करून देणे या शैक्षणीक सहलीमुळे शक्य झाले.

त्याचप्रमाणे मा. सचिव, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांचे आदेशुसार दि. २२ डिसेंबर २०१९ रविवार रोजी महाविद्यालयात ''युवा भुषण स्पर्धा'' आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत विद्यार्थ्यांची गटचर्चा, लेखी परीक्षा, मुलाखत घेऊन गुणवत्तेवर विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली यात, शारीरीक चाचणी घेण्यात आली. यासाठी महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी बहुमोल सहकार्य केले. १२७ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता.

तसेच ''बुलडाणा जिल्हा राज्यशास्त्र संशोधन व अध्यन मंच'' व्दारे पुरस्कृत सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजनही राज्यशास्त्र विभागाचे वतिने करण्यात आले होते. या स्पर्धेत ४५ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

**एम. ए. राज्यशास्त्र विद्यापिठ मेरीट/व सेट उत्तीर्ण:—**

विशेष आनंदाची बाब म्हणजे उन्हाळी — २०१९ मध्ये आयोजित एम. ए. राज्यशास्त्र विषयाच्या परिक्षेत महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु. पुनम प्रकाश काळे ही 'संगाबाअवि' मध्ये गुणवत्ता यादीत चौथी आली. तसेच NET/SET ची परीक्षा ती प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झाली. याबद्दल महाविद्यालयाच्या वार्षिक बक्षिस वितरण समारंभात तीला मान्यवरांचे हस्ते सन्मानीत करण्यात आले.

यावेळी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. जे. जे. जाधव यांचे वडीलांचे स्मृती निमीत्त कु. पुनम काळे यांना तर बी. ए. भाग—१ मध्ये प्रथम क्रमांकासाठी दत्ता गाढवे यांना 'स्व. जयसिंगराव जाधव' स्मृती पुरस्काराने अनुक्रमे १०००रू व ५००/— रूपयांचे बक्षिस देऊन सन्मानित करण्यात आले.

**संशोधन केंद्रास विद्यापिठाची मान्यता :—**

विशेष अभिमानाची बाब म्हणजे २०१९—२०२० मध्ये राज्यशास्त्र विभागात पीएच. डी. चे संशोधन केंद्र म्हणुन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापिठाने मान्यता दिली.